**<u>अर्जदाराचा उलटतपास सामनेवाला क्र.२ तर्फे वकील एस. वाय. बारटके यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>**

हे म्हणणे खरे आहे की, संपादीत जमिनीचे ३३०० चौ.मी क्षेत्र आहे. संपादनापुर्वी आम्ही सदरच्या संपादीत मिळकतीमध्ये भात व भाजीपाल्याची पिके घेत होतो. माझ्या संपादीत जमिनीच्या चार दिशांना कोणाच्या मिळकती आहेत ते मला सांगता येणार नाही. माझ्या संपादीत जमिनीच्या शेजारचे शेतकरी सुद्‌धा त्यांच्या जमिनीमध्ये भात पिके घेत होते. हे म्हणणे खरे आहे की, संपादनाच्यावेळी माझ्या शेताच्या बाजूच्या जमिनी बिनशेती झाल्या नव्हत्या. मला माझ्या संपादीत मिळकतीमध्ये जाण्यासाठी चार शेतक-यांच्या बांधावरुन जावे लागत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीला लागून डांबरी रस्ता नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावात सिडकोचे संपादन झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सिडकोच्या जमिनी व आमच्या जमिनी यात तफावत असते. द्रोणागिरी गाव हे संपादीत मिळकतीपासून २० कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, द्रोणागिरी गावात सिडको आले आहे. मी जे सदरचे प्रकरणात न्यायनिर्णय दाखल केले आहेत त्याबाबत मा. उच्च न्यायालयात अपील प्रलंबित आहे परंतु त्यात स्थगिती दिली आहे किंवा कसे ते मला माहित नाही.

२. चिखले हे गाव पनवेल पासून ४ ते ५ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी चिखले गावात कोणतेही संपादन झाले नव्हते. चिखले गावची लोकसंख्या पाच ते सात हजार आहे. हे म्हणणे खरे आहे की, यापुर्वी चिखले गावातुन

रेल्वेमार्ग गेलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी जे सदरचे प्रकरणात भूसंदर्भ प्रकरणांचे निकाल दाखल केले आहेत त्याचा माझे प्रकरणाशी काहीही संबंध नाही. सदरचा रेफरन्स अर्ज दाखल करण्याच्यावेळेस आमच्या गावातील जमिनींना रुपये १५०/- दर होता, असे दर्शविणारा कोणताही व्यवहार मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे गावातील जमिनीचा रुपये १,५००/- प्रति चौ.मी. दर होता, असे दर्शविणारा कोणताही व्यवहार मला आढळला नाही. चिखले गावच्या शेजारच्या गावातील जमिनींना प्रति चौ.मी. रुपये १५०/- किंवा रुपये २०००/- असा दर होता याबाबतचे कागद मला सापडले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की भूसंपादन अधिकारी यांनी त्या काळातील जो सर्वोच्च दर होता त्याप्रमाणे नुकसानभरपाई दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी सुद्धा सदरच्या रेल्वे मार्गाच्या बाजुच्या जमिनी बिनशेती झाल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, चिखले हे गाव व भिंगारवाडी हे गाव स्वतंत्र आहेत. हे म्हणणे खरे नाही की, चिखले गावामधील जमिनींचे जेव्हा संपादन झाले होते त्याच्या नुकसानभरपाईच्या रक्कमा हया त्या काळातील दराप्रमाणे योग्य होत्या. जुना मुंबई-पुणे हायवे कधी सुरु झाला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग हा सन १९९८ नंतर सुरु झाला. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९५ पर्यंत आमच्या गावात कोणताही नविन व्यवसाय सुरु झाला नव्हता. मला सांगता येणार नाही की, सदरच्या गावांची लोकसंख्या दोन ते तीन हजार आहे किंवा कसे.

३. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९५ साली चिखले

गावात औद्योगिक वसाहती नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी अवास्तव वाढीव रक्कम मिळण्यासाठी सदरचा अर्ज केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले न्यायनिर्णय, भाडेपट्टे, खरेदीखत हे वाद मिळकतीशी मिळतीजुळती नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझे संपादीत जमिनीच्या चारही बाजुस भातशेती होती. चिखले व इतर तीन गावे मिळून ग्रुप ग्रामपंचायत आहे. रोडपाली हे गाव चिखले शहरापासून ८ कि.मी.अंतरावर आहे. हे खरे की, सिडकोने संपादीत केलेल्या मिळकती बिनशेती स्वरुपाच्या झालेल्या आहेत. हे खरे आहे की, चिखले गावी ग्रामपंचायतीची नळपाणी योजना नाही.

४. संपादीत जमीनीमध्ये कोणताही झाड-झाडोरा नव्हता. संपादीत जमीनीच्या नोटीफिकेशनबाबत ज्या नोटीसा मला आल्या त्याला मी उत्तर दिलेले आहे, त्याच्या प्रती मी या केसमध्ये दाखल केलेल्या नाहीत. कलम ४, ६ अंतर्गत नोटीफिकेशनच्या ज्यावेळी नोटीसा माझ्याकडे आल्या त्यावेळी १,५०० दर चौ.मी. दर मी मागितला याबाबतीत माझ्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळी मला नोटीस आली होती त्यावेळी संपादीत मिळकतीस दर चौ.मी. ला रु.१,५००/- दर होता याबाबतीत मी कोणताही पुरावा भूसंपादन अधिकाऱ्याकडे दाखल केला नाही. त्याचा कागदोपत्री पुरावा मी अजुन दाखल केलेला नाही, त्याचा पुरावा मी पुढे दाखल करु शकतो. कलम १२(२) च्या नोटीसीची प्रत मी या प्रकरणात दाखल केलेली आहे. कलम १२(२) ची नोटीस मला ता. १४/१२/२०२३ रोजी मिळाली. कलम २८(अ) खालील ॲवार्ड एस.एल.ओ. ने कोणत्या

तारखेला केला हे माझ्या आता लक्षात नाही. हे खरे नाही की, ॲवार्ड झाला त्यावेळी मी एस.एल.ओ. कडे हजर होतो. हे खरे नाही की, प्रस्तूतचा अर्ज मी मुदतीत केलेला नाही.

५. भूसंपादन अधिकाऱ्यांशी माझी वितुष्टता नाही. हे खरे आहे की कलम ४ च्या नोटीफिकेशनच्या अगोदर अथवा त्या काळात चिखले गावात दर चौ. मी. ला रु.१,५००/- रुपये दर होता असे कोणतेही खरेदीखत नाही किंवा तसे कोणतेही त्या दराने भाडेपट्याचे व्यवहार नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, एल.ए.आर. मध्ये संपादनाच्यावेळी संबंधित गावात जे बाजारमुल्य असते ते विचारात घेतले जाते. हे म्हणणे खरे आहे की, मिळकतीचे मुल्य हे त्याच्या स्थानावरुन ठरत असते. चिखले गावात महाविदयालय, हॉस्पीटल इ. सुविधा नाहीत. रोडपाली, पडघे, वडघर, बोकडवीरा, कोपर, जासई, दापोली, कळंबोली, खारघर ही गावे सिडकोच्या अखत्यारीतील आहेत. त्या गावामध्ये १९७० साली सिडको आलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सिडकोची स्वत:ची अशी टाऊन प्लॅनिंग ॲथॉरिटी आहे. हे खरे नाही की, सिडकोसाठी संपादीत केलेल्या जमीनी हया सिडको हे त्या विकसीत करुन, पाणी, रस्ता, वीज इ. सुविधा दिल्या जातात. सिडको त्या जमीनीचा स्वत: ले आउट तयार करते. हे खरे नाही की, सिडको जमीन विकसीत करुन ती अन्य व्यक्तिंना हस्तांतरीत करीत असते. १९७५ पासून नवी मुंबईचा भाग विकसीत होणेस सुरुवात झाली, त्या भागात जशा योजना झाल्या तशी योजना चिखले गावात झाली नाही. १९९५ साली चिखले गावात टाऊन प्लॅनिंग स्कीम करण्यात आली नव्हती. आजही चिखले गावाला

ग्रुप ग्रामपंचायत आहे. चिखले गावाची लोकवस्ती २००० ते ३००० आहे.

६. हे म्हणणे खरे नाही की, मी जे निकालपत्र, खरेदीखत, भाडेकरार दिलेले आहेत, त्यातील जमीन व संपादीत जमीन यांचे स्थान भिन्न आहे. बोकडवीरा/ द्रोणागिरी हे गाव उरण शहराला लागून आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी संपादीत जमीन ही ग्रीन झोनमध्ये आहे. संपादीत जमिनीचे १९९५ साली मी झोन सर्टिफिकेट काढलेले नाही किंवा आताही काढलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीत जाण्याकरिता स्वतंत्र रस्ता नाही. हे म्हणणे खरे आहे की खारघर व कळंबोली हे मुंबई-पुणे हायवेला लागून आहेत. लोधिवली गाव सुध्दा मुंबई-पुणे हायवेला लागून आहे. जासई हे गाव जे.एन.पी. टी. च्या जवळ असलेले गाव आहे. १९७० नंतर दहा ते बारा वर्षानी जे.एन.पी.टी. बंदर अस्तित्वात आले, ते इंटरनॅशनल पोर्ट आहे. हे खरे नाही की, जे.एन.पी.टी.च्या आजुबाजूला जो विकास झाला तो चिखले मध्ये झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, खारघर हा परिसर १९९५ च्या सुमारास विकसीत होणेस सुरूवात झाली. हे खरे की, संपादीत जमीनीच्या ७/१२ पत्रकी झाडे होती अशी नोंद नाही. माझे १० गुंठे क्षेत्र संपादीत झाले. चिखले गावात संपादनाच्या वेळी त्या भागात जमीनी एन.ए. झाल्या होत्या व त्याला एन.ए. पोटॅन्शीएलीटी होती याबाबत कागदोपत्री पुरावा मी या प्रकरणात दाखल केलेला नाही.

७. हे म्हणणे खरे नाही की, चिखले गावातील जमिनींना रु.१,५००/- दर चौ.मी. दर होता असे कागदपत्र

काढून दाखल करणे १९९५ साली मला शक्य होते. चिखले गावात १९९५ साली मोठमोठया रहिवासी बिल्डींग्ज नव्हत्या. तसेच संपादनाच्यावेळी चिखले गावात औद्योगिक कारखाने नव्हते. रसायनी, पनवेल, तळोजा या भागातील एम.आय.डी.सी. हया साधारण १९६२ साली अस्तित्वात आल्या. तरी सुध्दा चिखले गावात १९९५ पर्यंत औद्योगिक विकास झाला नाही. १९९५ साली चिखले गावातील उत्पन्नाचे साधन हे शेती व जवळ असलेल्या औद्योगिक कारखान्यात नोकरी होय. हे म्हणणे खरे नाही की, एम.आय.डी.सी. चे पाणी हे तेथील जवळच्या औद्योगिक कारखान्याना केवळ दिले जाते. हे म्हणणे खरे नाही की, एम. आय.डी.सी. ने चिखले गावाला पाणी दिलेले आहे हे मी खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, चिखले गावात बराचसा विकास झाला होता किंवा त्या गावाच्या परिसरात बराच विकास झाला होता त्यामुळे १,५००/- रुपये दर चौ.मी. नुकसान भरपाई मिळावी असे जे मी सांगतो ते खोटे सांगतो.

८. हे म्हणणे खरे आहे की, संपादनाच्या वेळी चिखले गावात पेट्रोल पंप नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, हा मी चुकीचा रेफरन्स केलेला आहे व भूसंपादन अधिकाऱ्यांनी जो दर दिलेला आहे तो योग्य आहे. संपादीत जमीनीपैकी काही जमीन लागवड व काही ओसाड होती. हे म्हणणे खरे आहे की, संपादीत जमीनीमध्ये एम.आय.डी.सी. चे पाणी आलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, चिखले गावात एस.टी. ची सुविधा नाही. हे म्हणणे खरे नाही की, जमीनीचे मुल्य हे प्रत्येक १०० मीटरला बदलत असते. हे म्हणणे खरे नाही की, १९९५ साली चिखले

गावात कोणतेही गोडावून अस्तित्वात नव्हते. गोडावून असेल तर जिल्हाधिकारी यांची परवागनी घ्यावी लागते हे मला माहिती आहे. चिखले गावात गोडवून होते व त्यासाठी जिल्हाधिकारी यांची पुरावा प्रस्तूत प्रकरणात मी दाखल केलेला नाही.

९. हे म्हणणे खरे नाही की, संपादनाच्या वेळेस आम्हास नोटीस दिली नाही व म्हणणे मांडायची संधी दिली नाही हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, निवाडयाची रक्कम स्विकारताना आम्ही कोणतीही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९५ साली नैना प्रकल्प व प्रस्तावित अंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प मंजुर झालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, चिखले गाव नैना प्रकल्पामध्ये येत नाही. सरतपासात नमुद केलेल्या कंपन्या माझे जन्मापुर्वी पासून अस्तित्वात आहेत. हे खरे की, १९९५ साली कंपन्यांमुळे चिखले गावात नविन प्रकल्प आले नव्हते. हे म्हणणे खरे की संपादीत शेतीस लागुन असलेली मिळकत बिनशेती झाली नव्हती. चिखले गाव मुंबई-पुणे राष्टिय मार्गापासून १.५ कि.मी. आत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९५ साली चिखले गावात रु. १,५००/- प्र.चौ.मी. दराने खरेदीखते झालेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या मालकीचे क्षेत्र ३३०० चौ.मी एवढे आहे, हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजसुध्दा रु. १,५००/- चौ.मी. दर चिखले गावात नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटा अर्ज दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे.

**<u>उलटतपास सामनेवाला क्र.२ करीता पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

समक्ष,

सही/-
(ए. एस. बडगुजर)
दिनांक ०६/०३/२०२६ २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
पनवेल